जा.क्र.शिउसं/उ मा-४०५/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०२४-२०२५ | 11549
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : 10 OCT 2024

प्रति,

अध्यक्ष/सचिव कलर्स एज्युकेशनल सोसायटी, औध,जि. पुणे

विषय : सन २०२१ २०२२ या शेक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे करिता परवानगी (इरादापत्र) देण्याबाबत.

संदर्भ : १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.१,६ व २४) २०१२
२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मुंबई कडील .शासन निर्णय क्र. नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दि २०.६.२०१२
३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मुंबई कडील शासन निर्णय क्रमांक एसएफएस-१०१८/प्र.क्र. १११६/एसएम-२ दिनांक ९.९.२०१९
४ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मुंबई कडील शासन निर्णय क्रमांक एसएफएस-४७२१/प्र क्र ०३/एसएम-२, दि. १.४.२०२१
५. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,मुळशी, पौड (पुणे) यांचेकडील दिनांक ५.५.२०२२ रोजीचा तपासणी अहवाल
६ कलर्स एज्युकेशनल सोसायटी, औंध जि. पुणे यांचे पत्र दिनांक ३०.८.२०२२
७. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग एस एम-२ यांचेमार्फत २१.१०.२०२२ रोजीचा परवानगी आदेशाबाबत चा ईमेल संदेश
८.या कार्यालयाचे पत्र जा.क्र. शिउसं/प्राथ-२०४/इरादापत्र/पुवि/२०२२/११६५३,दि.१५.११.२०२२
९.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,पुणे यांचेकडील अहवाल जा.क्र. ज़ि प/शिक्षण/प्राथ/खाप्राशा/१५५५/२०२३ दि.३०.८.२०२३
१० या कार्यालयाचे पत्र जा.क्र.शिउसं/प्राथ-२०४/ज रा कु/मान्यता/पुवि/२०२३/११९७६, दिनांक २२.११.२०२३
११ कलर्स एज्युकेशनल सोसायटी मारुंजी पुणे यांचेकडील पत्र दिनांक २९.७.२०२४

वरील विषयी आपणासं कळविण्यांत येतं की,आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शेक्षणिक वर्ष सन २०१९-२०२० मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता /विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता सन २०१९-२०२० पासून खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे. तसेच संदर्भीय क्र. ४ नुसार निर्गमित झालेल्या शासन निर्णयात नमूद आहे की, ज्या शैक्षणिक संस्थांना सन २०१९-२०२० या शेक्षणिक वर्षाकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नविन शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यांत आलेली आहे व अशा संस्थांव्दारे संचलित शाळांची शाळा सुरु करण्याची विहित अठरा महिन्यांची मुदत ही दिनांक १ जून २०२० ते ३१ मे २०२१ या कालावधी दरम्यान संपत आहे. **अशा शैक्षणिक संस्थांना सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षापासून नविन शाळेस विशेष बाब म्हणून याव्दारे मुदतवाढ देण्यांत येत आहे. या कार्यालयाने संदर्भ क्रमांक १० व्दारे भोगवटा प्रमाणपत्र व आराखडयाबाबत कळविलेल्या त्रुटींची पूर्तता संबंधित संस्थेने संदर्भ क्र. ११ व्दारे केलेली आहे.**

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार,नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| - | पुणे | कलर्स एज्युकेशनल सोसायटी, औध,जि. पुणे | कलर्स इनोव्हेशन ॲकॅडमी, मारुंजी ता.मुळशी जि.पुणे | इंग्रजी | आय.जी.सी. एस.ई. नवीन शाळा | इ.१ ली ते इ.१० वी प्राथमिक ते माध्यमिक | संदर्भीय क्र.४चे शासन निर्णयात नमूद असलेनुसार २०२१-२०२२ |

**२.२ अटी व शर्ती:**

१.संस्थेने सदर प्रस्तावित शाळा शासन मंजूरीपूर्वीच सुरु केली नसल्याची शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी खात्री करावी. तथापि सदर शाळा शासन परवानगी घेण्यापूर्वीच सुरु केली असल्यास शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी सदर शाळेकडून रुपये एक लक्ष इतका दंड वसूल करुन त्याचा अहवाल या कार्यालयास व शासनास सादर करावा.तसेच संस्थेने सर्व्हे नं ३१/८ व ३१/१५ मधील दोन्ही जागा सलग असल्याबाबतचा नकाशा या कार्यालयाकडे सादर केलेला आहे.

२.सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यांत येणा-या सर्व नियमांची/तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३ शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम,२००९ मधील तरतुदींची पूर्तता करुन सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादापत्र) देण्यांत येत आहे.

Hemy

Colours Educational Society MAH/2246/2010/PUNE ★Pune★

Scanned with OKEN Scanner

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०२१-२०२२ करिता संदर्भीय क्र. ४ च्या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यांत आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करुन या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्यांच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) शासन निर्णय दिनांक २० जून २०१२मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार सी बी एस ई. मंडळाशी संलग्नतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N O C) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील.शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/ शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N O C)मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष,अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N O C) प्रमाणपत्र देईल.

४.परवानगी देण्यांत आलेल्या नविन शाळेस i. शासनाच्या वेळोवेळी निर्मित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

५.संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पूर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

६. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यांत येईल.

७. यु डायस डाटा : या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यांत आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-Dise (Unified District Information System For Education) मध्ये माहिती भरतांना, '' **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा**''म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद ,मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरिता '' **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा**'' असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

८. परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे यांची राहील.

(राजेंद्र अहिरे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

१. मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे
२. मा. राज्य प्रकल्प संचालक,महाराष्ट्र प्राथमिक परिषद मुंबई
३. मा शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे
४. मा शिक्षण संचालक (प्राथमिक ) महाराष्ट्र राज्य पुणे

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी

१.शिक्षणाधिकारी (माध्यमिक/प्राथमिक) जिल्हा परिषद पुणे
२. निवडनस्ती

Scanned with OKEN Scanner